# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

## साहेबरावजी बुट्टपाटील स्मृतिदिन

प्रभात पुणे
शनिवार, दि. ४ जानेवारी २०१४



### साहेबराव बुट्टे पाटील समाजासाठी जगले

#### राजेंद्र सांडभोर यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर, दि. ३ (वार्ताहर) - खेड तालुक्याचे सुपुत्र आणि सर्वसामान्यांसाठी राजकारण न करता समाजकारणात स्वःतला झोकून देणारा नेता म्हणून त्यांची ख्याती होती. कै. साहेबराव पाटील हे राजकारणात कै. यशवंतराव चव्हाण व केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांना गुरू मानत, असे विचार प्रमुख पाहुणे राजेंद्र सांडभोर यांनी व्यक्त केले.

कै. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त राजगुरुनगर येथे आज हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना सांडभोर म्हणाले की, खेड तालुक्याचे जनक आणि सर्वसामान्यांचे हित सांभाळणारे व राजकारणापेक्षा समाजकारण करणारे कै. साहेबराव बुट्टे पाटील हे विचारवंत व मुत्सद्दी नेते होते. त्यांचे चिरंजीव देवेंद्र बुट्टे पाटील यांना राजकारणाच्या वशापेक्षा समाजकारणाचा वसा लाभला असून त्यांना विचाराची झोळी लाभली आहे.

यावेळी सकाळी ८ वाजता हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कै. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या पुतळ्यास राजेंद्र सांडभोर यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी आणलेल्या ज्योतीचे स्वागत करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ वाहून अभिवादन केले. यावेळी कार्यक्रमात सर्वधर्मीय प्रार्थना घेण्यात आल्या. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी अनुराधा काळे, प्राजक्ता साबळे, प्रतिमा कराळे यांनी साहेबराव बुट्टे पाटील यांच्या जीवन चरित्रावरील विचार व्यक्त केले.

त्यानंतर महाविद्यालयाच्या जवळ असणाऱ्या हुतात्मा स्मारकात वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. नवीन इमारतीत भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शैलजाताई बुट्टे पाटील, राजमाला बुट्टे पाटील, ज्येष्ठ संचालक कोंडीबा टाकळकर, ॲड. मुकुंदराव आवटे, संचालक प्रा. प्रकाशराव चौधरी, सुशिल शिंगवी, जायभाय, अरविंद दौंडकर, बाळासाहेब सांडभोर, संचालक अश्विनी मोरमारे, आशिष वाडेकर, हरिभाऊ वाडेकर, प्रा. शिंदे, प्राचार्य डॉ. पाटील, उपप्राचार्य खेडेकर व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. यानिमित्ताने महाविद्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कै. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यातआला.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख